495

शासकीय अधिका-यांचे/कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहिणे/जतन करणेबाबत...

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र.सीएफआर-1295/प्र.क्र.36/95/13,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 28 जून, 1996.

## परिपत्रक

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे/जतन करणे याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीएफआर-1295/प्र.क्र.36/95/13, दिनांक 1 फेब्रुवारी, 1996 अन्वये एकत्रित सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यात गोपनीय अहवाल लिहिण्याचे सुधारित प्रपत्र (परिशिष्ट "ब") अंतर्भूत करण्यात आलेले आहे. त्यापैकी परिशिष्ट "ब" (भाग-1) यात गोपनीय प्रतिवेदनाचा नमुना देण्यात आलेला आहे. गोपनीय अहवाल लिहिण्याच्या प्रपत्रात सुधारणा करण्यात आल्यामुळे 1995-96 या वर्षाचा गोपनीय अहवाल लिहिताना परिशिष्ट "ब" (भाग-4) बरोबर सदर परिशिष्टाच्या भाग-1 ची प्रत सध्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना पुरविण्यात आल्यामुळे काही अधिकारी/कर्मचारी यांच्यात संभ्रम निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे. वास्तविक यापूर्वीचे गोपनीय अहवालाचे जे प्रपत्र होते, त्यातसुध्दा भाग-1 चा समावेश होता. त्यांचा गोपनीय अहवाल नस्तीचे निर्देशपत्र (Docket Sheet) म्हणून वापर केला जातो. तो वार्षिक गोपनीय अभिलेखाचा भाग नाही. कारण प्रतिवेदन अधिका-याने तो पूर्ण करावयाचा/लिहावयाचा नसतो. त्यात अंतर्भूत असलेली माहिती ही नव्याने नियुक्त झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या बाबतीत द्यावयाची आहे. ही माहिती संबंधित विभाग/कार्यालयाच्या आस्थापना शाखेकडे ठेवावयाची आहे. दरवर्षी ही माहिती देणे आवश्यक नाही. यामुळे ज्या अधिकारी/कर्मचा-यांच्या बाबतीत सदर माहिती या पूर्वीच देण्यात आलेली आहे, त्यांच्या बाबतीत ती पुन्हा नव्याने देण्याची/घेण्याची आवश्यकता नाही.

9009

96/6073

2. उपरोल्लेखित शासन आदेशातील परिच्छेद 12 व 13 मध्ये मागासवर्गीयांचे हितसंबंध जपले जातील यासाठी सुस्पष्ट तरतूद करण्यात आलेली आहे. त्या तरतुदींचे पालन सर्व संबंधितांकडून केले जाईल, त्याबाबतीत देखील कटाक्षाने काळजी घ्यावी.

8 NOV 1996
आस्थापना

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य.मा.जोशी,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या आस्थापना शाखा.

---

रोटा/एच-350(3,500-7-96)